ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 9 | MAY - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# शैक्षणिक चळवळीतील महिला सुधारकांचे योगदान व त्याचे परीणाम



**डॉ. दयानंद प्र. गायकवाड**
इतिहास विभाग प्रमुख, केमसी महाविद्यालय खोपोली
(मुंबई विद्यापिठाशी सलग्न)

**सारांश :**

भारतातील सामाजिक व शैक्षणिक सुधारणा चळवळीत महिला सुधारकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे. समाजात स्त्रियांना केवळ घरगुती कामे आणि कुटुंब सांभाळण्यापुरते मर्यादित ठेवले जात असे. बालविवाह, विधवांचे हाल, स्त्रियांची अशिक्षित अवस्था आणि अनेक सामाजिक बंधने यांमुळे त्यांचे जीवन अत्यंत कठीण झाले होते. अशा परिस्थितीत काही धाडसी महिला सुधारकांनी समाजातील अन्यायकारक प्रथांविरुद्ध आवाज उठवून स्त्रियांच्या शिक्षणासाठी मोठी चळवळ उभी केली.

सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे, फातिमा शेख, अनुताई वाघ या सर्व महिला सुधारकांच्या अथक प्रयत्नांमुळे भारतीय समाजात स्त्री शिक्षणाची चळवळ बळकट झाली. यामुळे भारतीय समाज अधिक प्रगत, सुशिक्षित आणि समताधिष्ठित बनण्यास मदत झाली. त्यामुळे शैक्षणिक चळवळीत महिला सुधारकांचे योगदान भारतीय इतिहासात अत्यंत मोलाचे मानले जाते.

## प्रस्तावना :

भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्री जीवन अतिशय खडतर होते प्राचीन काळापासून भारतीय समाजात अनेक सामाजिक समस्या आणि अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. समाजात स्त्रियांना घराच्या मर्यादेत ठेवले जात असे "चूल आणि मूल" ह्या प्रमाणे त्यांचे जीवन केवळ घरगुती कामे व कुटुंब सांभाळणे यापुरते मर्यादित होते. बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवांचे हाल, स्त्रियांची अशिक्षित अवस्था आणि स्त्री-पुरुषांमधील असमानता यामुळे स्त्रियांची सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय बनली होती. तसेच केशवपन, सतीप्रथा, या अनिष्ठ रूढी परंपरामुळे स्त्रियांच्या प्रगतीस मोठा अडथळा निर्माण झाला होता.

स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी सुरुवातीला समाजातील परंपरावादी लोकांकडून मोठा विरोध झाला. अनेकांना असे वाटत होते की स्त्रियांना शिक्षण दिल्यास समाजव्यवस्था बिघडेल. काही ठिकाणी महिला

शिक्षिकांना अपमान, टीका आणि अडथळ्यांना सामोरे जावे लागले. 19 व्या शतकाच्या सुरवातीपासून समाजातील काही प्रबुद्ध विचारांच्या व्यक्तींनी सामाजिक सुधारणांसाठी प्रयत्न सुरू केले. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे हे लक्षात घेऊन स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी विविध चळवळी उभारल्या गेल्या. ह्या मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांनी इ.स. १८४८ मध्ये पुणे येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू सुरू करून स्त्री शिक्षणाची पायाभरणी केली. सुरुवातीच्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाला समाजातील परंपरावादी परंपरावादी लोकांकडून तीव्र विरोध झाला. अनेकांना असे वाटत होते की स्त्रियांना शिक्षण दिल्यास समाजव्यवस्था बिघडेल. तरीही काही धाडसी महिला सुधारकांनी या विरोधाची पर्वा न करता स्त्रियांच्या शिक्षणासाठी कार्य करण्याचा निर्धार केला.

म्हणूनच शैक्षणिक चळवळीतील महिला सुधारकांचे कार्य भारतीय समाजाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात समानता, प्रगती आणि आधुनिकतेची नवी दिशा निर्माण झाली.

## उद्दिष्टे

१. शैक्षणिक चळवळीत कार्य करणाऱ्या महिला सुधारकांचा अभ्यास करणे.
२. स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नांचे महत्त्व समजून घेणे.
३. महिला सुधारकांच्या कार्यामुळे समाजात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
४. स्त्रियांच्या शिक्षणामुळे झालेल्या सामाजिक प्रगतीचा आढावा घेणे.
५. आधुनिक समाजात स्त्री शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करणे.

## पार्श्वभूमी

भारतातील शैक्षणिक चळवळीची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्या काळात भारतीय समाज विविध सामाजिक रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धांनी प्रभावित झाला होता. समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जात असे. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नसल्यामुळे त्या मोठ्या प्रमाणावर अशिक्षित राहिल्या. स्त्रियांचे जीवन प्रामुख्याने घरगुती कामे, कुटुंबाची जबाबदारी आणि सामाजिक बंधनांपुरते मर्यादित होते.

त्या काळात बालविवाह ही प्रथा मोठ्या प्रमाणात प्रचलित होती. लहान वयातच मुलींचे विवाह होत असल्यामुळे त्यांना शिक्षण घेण्याची संधी मिळत नसे. तसेच विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. पतीच्या मृत्यूनंतर त्यांना अनेक सामाजिक बंधने पाळावी लागत आणि त्यांचे जीवन अत्यंत कठीण बनत असे. स्त्रियांना स्वतंत्रपणे विचार मांडण्याची किंवा समाजातील निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळत नव्हती. त्यामुळे स्त्रियांची सामाजिक, आर्थिक आणि बौद्धिक प्रगती मोठ्या प्रमाणात अडथळ्यांत अडकली होती.

ब्रिटिश सत्तेच्या आगमनानंतर भारतात आधुनिक शिक्षणप्रणालीची सुरुवात झाली. या शिक्षणामुळे समाजातील काही प्रबुद्ध व्यक्तींमध्ये नवीन विचारसरणी विकसित झाली. त्यामुळे अनेक समाजसुधारकांनी सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांसाठी प्रयत्न सुरू केले. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, ही जाणीव हळूहळू समाजात निर्माण झाली.

सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे आणि आनंदीबाई जोशी यांसारख्या महिला सुधारकांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या सामाजिक उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. या सर्व प्रयत्नांमुळे भारतीय समाजात हळूहळू सकारात्मक परिवर्तन घडू लागले. अशा प्रकारे सामाजिक परिस्थिती, आधुनिक शिक्षणाचा प्रभाव आणि महिला सुधारकांचे प्रयत्न या सर्व घटकांच्या एकत्रित परिणामातून शैक्षणिक चळवळीची भक्कम पार्श्वभूमी तयार झाली.

## शैक्षणिक चळवळीतील प्रमुख महिला सुधारक

### सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले या भारतीय स्त्री शिक्षणाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी आपल्या पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सहकार्याने इ.स. १८४८ मध्ये पुणे येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे हा समाजाच्या दृष्टीने अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारक निर्णय होता.

सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांना स्वावलंबी आणि जागरूक बनविण्याचा प्रयत्न केला. त्या दररोज शाळेत जात असताना समाजातील काही लोक त्यांच्यावर दगड, चिखल आणि शेण फेकत असत. तरीही त्यांनी आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांनी शिक्षणाचे कार्य अखंडपणे चालू ठेवले. त्यांनी केवळ मुलींसाठीच नव्हे तर दलित, शोषित आणि वंचित समाजातील मुलांसाठीही शिक्षणाची दारे उघडली. त्यांनी अनेक शाळा सुरू करून शिक्षणाचा प्रसार केला.

तसेच बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू करून अनाथ आणि निराधार मुलांचे संरक्षण केले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे समाजात स्त्री शिक्षणाची सुरुवात झाली आणि स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार मिळू लागला. त्यामुळे त्या भारतीय स्त्री शिक्षणाच्या चळवळीतील अग्रणी महिला सुधारक मानल्या जातात

### फातिमा शेख

ह्या भारतीय शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसुधारक होत्या. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या त्या सहकारी होत्या. शेख या आधुनिक भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिकांपैकी एक असून त्यांनी फुले यांच्या शाळेत दलित मुलांना शिक्षण देण्याचे काम केले. फातिमा शेख यांचा जन्म ९ जानेवारी १८३१ रोजी झाला. मियां उस्मान शेख या त्यांच्या भावाच्या घरी ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले यांनी वास्तव्य केले होते. फातिमा शेख यांच्यासह ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले यांनी दलित समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याची जबाबदारी घेतली.

अमेरिकन मिशनरी सिंथिया फरारकडून चालवल्या जाणाऱ्या शिक्षक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर त्यांची भेट सावित्रीबाई फुलेंशी झाली. फुलेंनी स्थापन केलेल्या पाचही शाळांमध्ये त्यांनी शिकवले. तसेच त्यांनी सर्व धर्म आणि जातीच्या मुलांना शिकवले. १८५१ मध्ये मुंबईत दोन शाळांच्या स्थापनेत शेख यांनी भाग घेतला.

अमेरिकन शिक्षक प्रशिक्षण संस्थेत त्यांची भेट सावित्रीबाई फुलेंशी झाली. १८४८ साली पुण्यात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची शाळा सुरू केली. या शाळेत फातिमा शेख शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. ही शाळा सुरू केल्यानंतर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना घर सोडावं लागलं होतं, त्यावेळी त्यांनी शेखच्या घरी वास्तव्य केले. फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्यानं शिक्षणाच्या कामाला सुरुवात केली. त्यांनी सर्व धर्म आणि जातीच्या मुलांना शिकवले.

शेख यांनी आयुष्यभर समतेसाठी काम केलं. त्यांनी दारोदार जाऊन शिक्षणाचं महत्त्व पटवून देण्याचं काम केलं. फातिमा शेख यांनाही सावित्रीबाई फुले यांच्या प्रमाणे त्याकाळातील लोकांकडून त्रास झाला.

## पंडिता रमाबाई

पंडिता रमाबाई या १९ व्या शतकातील एक विद्वान आणि प्रगत विचारांच्या महिला समाजसुधारक होत्या. त्यांना संस्कृत भाषेचे सखोल ज्ञान असल्यामुळे त्यांना “पंडिता” ही उपाधी मिळाली. त्यांनी समाजातील स्त्रियांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या अधिकारांसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी पुणे येथे शारदा सदन ही संस्था स्थापन केली. या संस्थेमध्ये विशेषतः विधवा आणि निराधार महिलांना शिक्षण दिले जात असे.

त्या काळात विधवांचे जीवन अत्यंत दुःखद आणि कठीण होते. समाज त्यांच्याकडे तुच्छतेने पाहत असे. अशा परिस्थितीत पंडिता रमाबाई यांनी विधवांना शिक्षण, आश्रय आणि स्वावलंबनाची संधी दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांच्या शिक्षणाविषयी जागृती निर्माण झाली. त्यांनी महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. पंडिता रमाबाई यांच्या कार्यामुळे स्त्री शिक्षणाची चळवळ अधिक मजबूत झाली आणि समाजात महिलांच्या अधिकारांविषयी सकारात्मक बदल घडू लागले.

## रमाबाई रानडे

रमाबाई रानडे या प्रसिद्ध समाजसुधारक आणि महिला शिक्षणाच्या समर्थक होत्या. त्या महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नी होत्या. आपल्या पतींच्या प्रेरणेने त्यांनी समाजकार्य आणि स्त्री शिक्षणाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. रमाबाई रानडे यांनी महिलांच्या शिक्षणासाठी आणि स्वावलंबनासाठी अनेक उपक्रम सुरू केले. त्यांनी महिलांना वाचन, लेखन आणि विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी संस्था स्थापन केल्या. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे हा त्यांच्या कार्याचा प्रमुख उद्देश होता.

इ.स. १९०८ मध्ये श्री. बी.एम. मलबारी आणि श्री. दयाराम गिडुमल हे, रमाबाईंकडे स्त्रियांना रुग्णसेवेचे प्रशिक्षण देऊन समाजात रुग्णसेविका निर्माण करण्याची कल्पना घेऊन आले. त्यातूनच मग रमाबाईंच्या मार्गदर्शनाखाली सेवा सदन, मुंबईची स्थापना झाली. इ.स. १९१५ साली, सेवा सदन, पुणे उदयास आली आणि

मग अनेक शाखांमार्फत संस्था विस्तारत गेली. मुलींचे प्रशिक्षण केंद्र, तीन वसतीगृहे असे अनेक उपक्रम सेवा सदनमार्फत राबवले गेले.

इ.स. १९२४ मध्ये, रमाबाईंच्या मृत्यूसमयी पुण्याच्या सेवा सदनमधील विविध उपक्रमांमध्ये १०००हून अधिक महिला प्रशिक्षण घेत होत्या. सेवा सदनचा झपाट्याने झालेला विस्तार आणि प्रसार हा रमाबाईंच्या ध्यासाचेच द्योतक आहे. समाजातील रूढ समजुतींच्या विरोधात ठाम भूमिका घेऊन समाजाचे मतपरिवर्तन करून सेवेचे अखंडित व्रत सुरू ठेवण्यातच रमाबाईंच्या जीवनाची इतिकर्तव्यता होती.

## आनंदीबाई जोशी

आनंदीबाई जोशी या भारतीय इतिहासातील एक प्रेरणादायी महिला आहेत. त्या भारतातील पहिल्या महिला डॉक्टरांपैकी एक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी परदेशात जाऊन वैद्यकीय शिक्षण घेतले आणि भारतीय महिलांसाठी एक आदर्श निर्माण केला.

१८८३ मध्ये, वयाच्या एकोणिसाव्या वर्षी विमेन्स मेडिकल कॉलेज ऑफ पेन्सिल्व्हेनिया मध्ये प्रवेश मिळाला. तेथे गेल्यानंतर अमेरिकेतील नवीन वातावरण आणि प्रवासातील दगदग यामुळे आनंदीबाईंची प्रकृती खूप ढासळली होती. परंतु अमेरिकेतील कारपेंटर जोडप्याचे साहाय्य त्यांना लाभले. कष्टाच्या आणि जिद्दीच्या जोरावर अभ्यासक्रम दोनच वर्षांत पूर्ण करून मार्च इ.स. १८८६ मध्ये आनंदीबाईनी एम.डी.ची पदवी मिळवली.

एम.डी.साठी त्यांनी ''हिंदू आर्य लोकांमधील प्रसूतिशास्त्र'' या विषयावर प्रबंध लिहिला. एम.डी. झाल्यावर व्हिक्टोरिया राणीकडून त्यांचे अभिनंदन झाले.

त्या काळात महिलांना घराबाहेर शिक्षणासाठी पाठवणे समाजाला मान्य नव्हते. तरीही त्यांनी अनेक अडचणींना सामोरे जात परदेशात जाऊन वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या या धाडसी निर्णयामुळे समाजात महिलांच्या उच्च शिक्षणाविषयी सकारात्मक विचार निर्माण झाला.

## ताराबाई शिंदे

ताराबाई शिंदे या एकोणिसाव्या शतकातील एक धाडसी विचारवंत आणि समाजसुधारक होत्या. त्या सत्यशोधक चळवळीच्या विचारांनी प्रेरित होत्या. त्यांनी समाजातील स्त्रियांच्या दुय्यम स्थानावर कठोर टीका केली. शिक्षणाने त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले होते. त्या मराठी, संस्कृत तसेच इंग्रजी शिकल्या. शिक्षणामुळे त्यांना वाचनाची आवड होती. स्त्री असूनही घोडा चालवायला शिकल्या. ताराबाई शेतीच्या कामात लक्ष घालीत तसेच कोर्टाचीही कामे करत.

त्यांचे प्रसिद्ध लेखन "स्त्री-पुरुष तुलना" हे भारतीय स्त्रीवादी विचारसरणीतील एक महत्त्वपूर्ण ग्रंथ मानले जाते. या ग्रंथामध्ये त्यांनी स्त्रियांच्या जीवनातील अन्याय, समाजातील दुटप्पी नैतिकता आणि पुरुषप्रधान व्यवस्थेवर तीव्र टीका केली आहे. म्हणूनच महात्मा फुले यांच्या 'सत्सार ' या अनियतकालिकांच्या दुसऱ्या अंकात ताराबाईचे मनापासून कौतुक झाले.

ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार समाजासमोर मांडला. त्यांच्या लेखनामुळे समाजात स्त्रियांच्या अधिकारांविषयी जागृती निर्माण झाली. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य यांचे

महत्त्व पटवून दिले.त्यांच्या विचारांचा स्त्री शिक्षणाच्या चळवळीवर मोठा प्रभाव पडला आणि समाजसुधारणेच्या प्रक्रियेला गती मिळाली.

## जनाक्का शिंदे

महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्त्या आणि थोर समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे यांच्या लहान भगिनी. तत्कालीन पारंपरिक समाजव्यवस्थेची चौकट मोडून त्यांनी हे शिक्षण घेतले होते. स्त्रियांना शिक्षण देणे, त्यांना नोकऱ्या मिळवून देणे. त्यांचे सामाजिक प्रबोधन करणे ह्यामध्ये त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. विठ्ठल रामजी शिंदे यांनी जनाक्कांचे शिक्षण सुरू केले. पुढे पुण्यातील हुजूरपागा शाळेत मिस हरफर्ड व मिस मेरी भोर यांच्या प्रयत्नातून जनाक्का इंग्रजी सहावीपर्यंत शिकल्या. मुधोळ संस्थानाची दरमहा दहा रुपयांची शिष्यवृत्ती त्यांना मिळाली होती. जनाक्का गायन, वादन व शिवणकामातही पारंगत होत्या. पनवेल येथील म्युनिसिपल प्राथमिक शाळेत मुख्य शिक्षक म्हणून रुजू झाल्या

जनाक्कांनी अस्पृश्य महिलांच्या सेवेसाठी 'निराश्रीत सेवासदन' स्थापन केले २१ मे १९०७. सदनाची सर्वस्वी जबाबदारी जनाक्का यांनी सांभाळली. जनाक्कांनी अस्पृश्य स्त्रियांच्या वैद्यकीय समस्यांकडेही लक्ष दिले. समाजातील बहिष्कृत वर्गातील स्त्री आणि तिचे प्रश्नही महत्त्वाचे आहेत, ही जाणीव जनाक्कांना होती. ज्यांचा स्पर्शही विटाळ मानला जात होता, अशा समाजातील स्त्रियांच्या बाळंतपणात त्यांना हव्या असणाऱ्या औषध उपचारांची गरज समजून घेऊन त्यांनी काम केले. अस्पृश्य मुलींसाठी निराश्रित साहाय्यकारी मंडळाने परळ (मुंबई) येथे शाळा सुरू केली (१९०८) होती. या शाळेच्या व वसतिगृहाच्या देखरेखीचे कामही जनाक्का करत होत्या.

## अनुताई बालकृष्ण

या आदिवासी समाजासाठी काम करणाऱ्या समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ होत्या. त्यांनी शिक्षणाद्वारे आदिवासींच्या जीवनात जागृती निर्माण करण्याचे काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी इ.स. १९२३ साली शंकर वामन जातेगावकर यांच्याशी अनुताईंचा विवाह झाला. परंतु सहा महिन्यांतच त्यांना वयाच्या तेराव्या वर्षी वैधव्य आले. असे असूनसुद्धा तत्कालीन सामाजिक रूढींचे बंधन झुगारून त्यांनी शिक्षण घेतले व शिक्षिका म्हणून काम करीत असताना त्यांना ताराबाई मोडक भेटल्या आणि त्यांनी ताराबाईंच्या बोर्डी (ठाणे) येथे आदिवासींसाठी असलेल्या ग्राम बाल शिक्षण केंद्रात प्रवेश केला व तेथे इ.स. १९४७ ते १९९२ अशी ४७ वर्षे त्यांनी निरपेक्ष वृत्तीने ग्रामशिक्षणाचे कार्य चालवले. पुढे कोसबाडच्या नूतन बाल शिक्षण केंद्राच्या चालक, राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकरिणी सदस्य, अखिल

प्रबोधनासाठी वाहिलेल्या शिक्षणपत्रिका व स्त्रीजागृतीसाठी असलेल्या 'सावित्री' मासिकाच्या त्या संपादिका होत्या. कोसबाडच्या टेकडीवर आदिवासींच्या उन्नतीसाठी एक संस्था स्थापन केली. या संस्थेलाच 'कोसबाड प्रकल्प'म्हणून ओळखले जाते. आदिवासींच्या शिक्षणासाठी पाळणाघरे, बालवाड्या, प्राथमिक शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालसेविका ट्रेनिंग ह्या शैक्षणिक संस्था सुरू केल्या.

भारताच्या केंद्र सरकारतर्फे साक्षरता प्रसारार्थ अनुताईंनी लिहिलेल्या सहजशिक्षण या पुस्तकास इ.स. १९८१ साली राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले होते. आदिवासींच्या शिक्षणासाठी अनेक संस्था स्थापन करून आयुष्य वेचणाऱ्या या अनुताईंना आदर्श शिक्षिका, दलितमित्र, आदर्श माता, फाय फाऊंडेशन, सावित्रीबाई फुले, बाल कल्याण राष्ट्रीय पुरस्कार, जमनालाल बजाज पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांबरोबरच पद्मश्री ने सन्मानित केले गेले.

## शैक्षणिक चळवळीतील महिला सुधारकांचे परिणाम

शैक्षणिक चळवळीत कार्य करणाऱ्या महिला सुधारकांमुळे भारतीय समाजात अनेक सकारात्मक आणि दीर्घकालीन बदल घडून आले. या चळवळीमुळे स्त्रियांना शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक स्थान प्राप्त झाले. खाली या चळवळीचे प्रमुख परिणाम सविस्तर दिले आहेत.

### स्त्री शिक्षणाचा प्रसार

महिला सुधारकांच्या प्रयत्नांमुळे समाजात स्त्री शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. पूर्वी मुलींना शिक्षण घेण्याची संधी मिळत नव्हती. परंतु सावित्रीबाई फुले यांसारख्या सुधारकांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्यामुळे स्त्री शिक्षणाची सुरुवात झाली.यामुळे समाजात शिक्षणाचे महत्त्व वाढले आणि अनेक कुटुंबांनी आपल्या मुलींना शाळेत पाठवण्यास सुरुवात केली.

### स्त्रियांच्या सामाजिक स्थानात सुधारणा

पूर्वी स्त्रियांना समाजात दुय्यमस्थान दिले जात होते. शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांनी स्वतःचे हक्क ओळखायला सुरुवात केली.महिला सुधारकांच्या कार्यामुळे स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान मिळू लागले आणि त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली.

### सामाजिक कुप्रथांमध्ये घट

शिक्षणामुळे समाजातील अनेक वाईट प्रथा कमी होऊ लागल्या. बालविवाह, विधवांवरील अत्याचार, स्त्रियांना शिक्षण न देणे यांसारख्या प्रथांविरुद्ध समाजात जागृती निर्माण झाली.

पंडिता रमाबाई यांसारख्या सुधारकांनी विधवांसाठी शिक्षण आणि आश्रय उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल झाले.

### महिलांच्या स्वावलंबनात वाढ

शिक्षणामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी मिळाली. शिक्षित महिलांनी शिक्षक, डॉक्टर, समाजसेविका इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये काम करण्यास सुरुवात केली.उदाहरणार्थ, आनंदीबाई जोशी यांच्या यशामुळे अनेक महिलांना उच्च शिक्षण घेण्याची प्रेरणा मिळाली.

## स्त्री-पुरुष समानतेची जाणीव

महिला सुधारकांच्या कार्यामुळे समाजात स्त्री-पुरुष समानतेचा विचार बळकट झाला. स्त्रियांना शिक्षण मिळाल्यामुळे त्यांनी आपल्या अधिकारांविषयी जागरूकता निर्माण केली.

ताराबाई शिंदे यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांच्या हक्कांविषयी व्यापक चर्चा सुरू झाली.

## महिलांच्या सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढला

शिक्षणामुळे महिलांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली.रमाबाई रानडे यांनी महिलांना समाजकार्य आणि सार्वजनिक कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित केले.

## आधुनिक शिक्षणव्यवस्थेची पायाभरणी

महिला सुधारकांच्या प्रयत्नांमुळे मुलींसाठी स्वतंत्र शाळा, शिक्षणसंस्था आणि प्रशिक्षण केंद्रे सुरू झाली. यामुळे भारतातील आधुनिक शिक्षणव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळाली.

स्त्री शिक्षण ही समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक गोष्ट आहे, ही जाणीव समाजामध्ये निर्माण झाली.

## निष्कर्ष

भारतातील शैक्षणिक चळवळ ही समाजपरिवर्तनाची एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया ठरली. या चळवळीत महिला सुधारकांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. समाजात स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळत नव्हती, त्यांना दुय्यम स्थान दिले जात होते आणि अनेक सामाजिक बंधनांमुळे त्यांचे जीवन मर्यादित झाले होते. अशा परिस्थितीत काही धाडसी आणि दूरदृष्टी असलेल्या महिलांनी पुढाकार घेऊन स्त्री शिक्षणाचा मार्ग खुला केला.

सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी आणि ताराबाई शिंदे जनाक्का शिंदे यांसारख्या महिला सुधारकांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी समाजातील अडचणी, विरोध आणि संकटांना धैर्याने सामोरे जाऊन स्त्रियांना शिक्षण, स्वाभिमान आणि स्वावलंबन यांचा मार्ग दाखवला.

अशा प्रकारे शैक्षणिक चळवळीतील महिला सुधारकांनी भारतीय समाजाच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कार्यामुळे स्त्रियांच्या शिक्षणाचा पाया मजबूत झाला आणि आजच्या आधुनिक व प्रगत समाजाच्या निर्मितीसाठी एक भक्कम आधार तयार झाला.

## संदर्भसूची


१. करमरकर, स. म. (२०१२). *भारततील समाजसुधारक.* कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
२. कीर, धनंजय. (२०१३). *महात्मा ज्योतिराव फुले.* पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
३. कुलकर्णी, शं. ना. (२०१०). *आधुनिक भारतातील सामाजिक चळवळी.* डायमंड प्रकाशन, पुणे.
४. ग्रोव्हर, बी. एल., व यशपाल. (२०१०). *आधुनिक भारताचा इतिहास.* एस. चंद अँड कंपनी, नवी दिल्ली.

५. **चव्हाण, सुनील**. (२०१२). *पंडिता रमाबाई*. **ग्रंथाली प्रकाशन**, **मुंबई**.
६. **जोशी, रा. ग**. (२०१६). *भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास*. **मेहता प्रकाशन**, **मुंबई**.
७. **दत्ता, के. के**. (२००८). *भारतीय समाजसुधारक*. **ऑक्सफर्ड प्रकाशन**, **नवी दिल्ली**.
८. **पाटील, अ. रा**. (२०१४). *भारतीय सामाजिक सुधारणा चळवळ*. **विद्या प्रकाशन**, **पुणे**.
९. **साळुंखे, आ. ह**. (२०११). *स्त्री शिक्षणाची वाटचाल*. **लोकवाङ्मय गृह**, **पुणे**.
१०. **शहा, म. ब**. (२०१५). *सावित्रीबाई फुले चरित्र*. **डायमंड प्रकाशन**, **पुणे**.